# अस्मिता

म. ग्रं. सं. ठाणें
विषय ३१०५
सं. क्र. १२८४



REFBK-0011233
REFBK-0011233

कृष्णचंद्र भोईटे

# अस्मिता

कृष्णचंद्र भोईटे

99233

REFBK-0011233
REFBK-0011233

मूल्य दोन रुपये

प्रकाशक :
विलास रघुनाथ भोईटे
आरडगांव (पो. हिंगणगांव)
जि. उ. सातारा

*

सर्व हक्क श्री. कृष्णचंद्र रघुनाथ भोईटे,
यांचे स्वाधीन

*

प्रथमावृत्ति
ऑगस्ट, १९६०

*

मुद्रक :
चिं. ग. वझे,
साधना प्रेस,
४३०/३१ शनिवार पेठ, पुणें २

आईवडिलांच्या चरणीं....

अनुक्रम .................... दि: ............
क्रमांक .................... नों: दि: ............

# निवेदन

'अस्मिता' हा माझ्या भावविश्वाचा पहिला फुलोरा. माझ्या काव्याची भूमिका मांडण्यांचें धारिष्ट्य येथें मी करीत नाहीं. माझ्या कवितेच्या रूपाविषयीं किंवा प्रेरणांविषयीं असा विचार मीं अजून केलेला नाहीं. तथापि, मी माझ्या स्वतःच्या सोपपत्तिक दृष्टिकोनांतून आजची काव्यविषयक भूमिका मांडली तर अप्रस्तुत ठरणार नाहीं, असा विश्वास आहे. काव्याची प्रयोजनें अभ्यासित असतां माझें अंतर्मन घुसळून निघत आहे.

वाङ्मयाची सुरुवात काव्यानें झाली असल्यानें अपरिहार्यपणें काव्याला श्रेष्ठत्व प्राप्त झालें आहे. कविता ही एक श्रेष्ठ कला आहे. या कलेच्याद्वारें मुख्यतः सौंदर्यदर्शन होत असतें. कवि हा 'शब्दसृष्टीचा ईश्वर' आहे, असें मानण्यांत येतें. काव्याच्या लेखन-पद्धतींत झपाट्यानें बदल होत आहेत. नव्या जुन्या लेखनपद्धति निर्माण होत आहेत. जुन्या कवींचें जुनें संकेत टाकून समाजास पोषक व इष्ट असे नवे संकेत रूढ होऊं पाहत आहेत. संकेतनिष्ठामय काव्यरचना मागें पडत आहे. जुन्या वाङ्मयाप्रमाणें केवळ मनोरंजन न करतां समाजांतील सुख-दुःखाशीं एकरूप होऊन सांप्रत सामाजिक परिस्थिति व्यक्त करण्याकडे लक्ष जात आहे. असें असतां जुनी चौकट तोडून ज्यावेळीं नवीन संकेत, नवीन रचनातत्त्वें, नव्या पद्धति शोधल्या जातात, त्यावेळीं अराजकतेचा भासमान देखावा अपरिहार्यपणें पहावा लागतो. वस्तुतः आजकालच्या वाङ्मयांत वादस्थळें खूप आहेत. वाङ्मयीन प्रश्न बरेचसे अवघड स्वरूपाचे झाले आहेत. वाङ्मयांतील नियम व व्याख्या यांनीं कूट स्वरूप धारण केलें आहे. यामुळें वाङ्मयीन सौंदर्याला आपण मुकत आहोंत. वाङ्मयाकडे शास्त्र या दृष्टीनें पाहण्याऐवजीं सौंदर्याच्या अनुभूतींतून पाहाणें अत्यंत आवश्यक आहे.

आज नवकाव्यावर अनुकूल-प्रतिकूल टीका होत आहे. त्यासंबंधीं कांहीं म्हणावयाचें नाहीं. नवकाव्याचें भवितव्य काळ ठरवीलच ! पूर्वग्रह न ठेवतां नवकाव्याकडे पाहायला शिकलें पाहिजे. नवकाव्यावर होत असलेली टीका अनुचित आहे. केशवसुत, विनायक, बालकवि किंवा रविकिरण मंडळींनीं जी रचना केली तेंच काव्य असा अट्टाहास धरणें योग्य नाहीं. आजच्या

काव्याकडे प्रगतीच्या व्यापक दृष्टिकोनांतून पाहिल्यास त्यांतील थोरपणा प्रत्ययास आल्यावांचून राहणार नाहीं. त्यांत आजच्या आशा-आकांक्षांचें चित्रण आहे, समाजांतील सुखदुःखांशीं समरस होऊन काल्पनिक सुखाच्या आहारीं न जातां सांप्रतच्या परिस्थितीवर विचार करण्याइतपत प्रगल्भता त्यांत आहे. केवळ आनंद प्राप्त करून देणें हा काव्याचा संकुचित दृष्टिकोन नवकवींनीं आपल्यापुढें ठेवला नाहीं. नवकाव्यामुळें सामाजिक अनुभूति जन्माला येत आहे; सामाजिक बदलांचें प्रतिबिंब आपणांला पाहावयास मिळत आहे. नवकाव्यासंबंधीं अलीकडे खूपच चर्चा झाली आहे. नवकाव्य स्थिरावल्यासारखें वाटूं लागलें आहे. नवकाव्यानें मराठी वाचकांचें लक्ष आकृष्ट करून घेतलें आहे. नवकाव्यासंबंधींच्या चर्चांमधून नवकाव्याची भूमिका, स्वरूप व वैशिष्ट्यें स्पष्ट होत आहेत.

नवकवींच्या प्रतिक्रियांतून सामाजिक व मानवतावादी विषय हताळले जात आहेत. या त्यांच्या प्रतिक्रियांतून वैयक्तिक अनुभूतीहि पाहावयास सांपडतात. सामाजिक वास्तवतेचा सडेतोड आविष्कार नवकवींच्या कलाकृतींतून होत आहे. सांकेतिक बंधनापासून नवकाव्य दूर होत आहे. नवे संकेत, प्रतीकें, अंतर्मनाचें धीट चित्रण, प्रतिमांचीं नावीन्यें, स्वरूप, गूढ सूचकता आदींच्या धीट आविष्कारांतून—नवकवींची अनुभूति वैशिष्ट्यपूर्णतेनें व्यक्त होत आहे. जीवनांत प्रत्येक क्षणीं जें घडलें, अनुभवलें, पाहिलें, त्यामुळें अंतर्मनांत जें भावनांचे कल्लोळ उसळले त्यांचीं प्रतीकें नवकाव्यांतून पाहावयास सांपडतात. 'मानवजातीची हरघडी घडणारीं जिवंत प्रतीकें' असा नवकाव्याचा उल्लेख करतां येईल.

वास्तवतेच्या सूक्ष्म अवलोकनांतून आशावादी व निराशावादी अशा दोन प्रकारच्या अनुभूतींचें प्रकटीकरण नवकाव्यांतून करण्यांत येत आहे. उदात्त ध्येयें व विद्रूप वास्तवता यांच्या संघर्षांतून व्यक्त होणाऱ्या भावना या नवकाव्याच्या दोन प्रवृत्तींतून चितारल्या जात आहेत,

दुसरें महायुद्ध, त्याचे जगांवरील व भारतावरील परिणाम, जागतिक भांडवलशाहीची अधोगति व त्यांतून निर्माण झालेली देशी भांडवलशाहीची प्रतिगामी वृत्ति, यंत्रामुळें मानवीजीवनाचा होत असलेला ऱ्हास या सर्वांचा परिणाम नवकवींवर झाल्यानें त्या अनुभूतींतूनच नवकाव्यास आकार येऊं पाहत आहे. भांडवलशाहा, सरंजामदारवर्ग एकत्र आल्यानें बहुजनसमाज व

मध्यमवर्ग यांची स्थिति केविलवाणी झाली आहे. हे दोन्ही वर्ग पिळले जात असून सर्व देशभर विपन्नतेच्या यातना ग्रासत आहेत. शेतकरी, कामगार व मध्यमवर्गांत औदासिन्य निर्माण झालें आहे. हा वर्ग एका निराशेच्या भावनेनें खचून गेला आहे. तो यांतून सुटकेची वाट पाहत आहे. या पिळल्या जाणाऱ्या वर्गावर आज अपरिहार्यपणें पुरोगामी संस्कार होत आहेत. आर्थिक हिताला चटावलेल्या भांडवल व सरंजामशाहीचा उच्छेद करायला निघालेल्या ह्या वर्गानें एका नव्या वैचारिक तत्त्वज्ञानाचें अधिष्ठान निर्माण केलें आहे. यांतूनच नवें वाङ्मय जन्माला येत आहे. नव्या कलांचा अभ्युदय होत आहे. दोन महायुद्धांच्या जबरदस्त तडाख्यांमुळें मानवीजीवन दुभंगल्यासारखें झालें आहे. 'पावसाळे आले–गेले, दोन महायुद्धें जमा झालीं' अशा व्यवहार-वादांतून अर्थशून्यता जन्माला आली आहे. मानवी मन दोन महायुद्धांच्या गंभीर. समस्यांमुळें दुबळें बनलें आहे. या जीवन मृत्यूंच्या अनुभवाच्या तत्त्वावर नवकाव्यांतील विरोधाची उभारणी झाली आहे.

यंत्रसंस्कृतीचा तिरस्कार नवकाव्यांतील एका विचार-प्रवृत्तीकडून केला जातो हें खरें आहे. परंतु अशा अशास्त्रीय विचारसरणीमागील दृष्टिकोन हाच की, यंत्राच्या मालकवर्गामुळें व भांडवलदार वर्गामुळें समाजाचा ऱ्हास होत आहे. या यंत्रसंस्कृतीनें माणसाला दास केलें आहे. यामुळें तुच्छतामूलक ( Cynic ) विचारसरणी बळावत आहे. या तुच्छतावादी निराशामूलक प्रवृत्तीमुळें नवकाव्याविषयीं साशंकता निर्माण झाली आहे. यांत्रिक प्रगतीनें मानवीजीवनाचा सर्वनाश होत आहे अशी अबुद्धिवादी विचारधारा निर्माण केल्यानें किंवा केवळ यंत्रसंस्कृतीचा तिरस्कार केल्यानें त्यांतून सुटका होणार नाहीं. यंत्रसंस्कृतीचें राष्ट्रीयीकरण झाल्यास यंत्राची वैयक्तिक मालकी जाऊन सामुदायिक मालकी आल्यास जीवनाची कीड हटेल.

स्वातंत्र्य प्राप्तीपूर्वी व नंतरच्या काळांत कल्पनारम्य काव्य ( Romantic Poetry ) आणि राष्ट्रवादी काव्य अशा दोन स्वरूपाच्या प्रतिक्रिया होत्या. स्वातंत्र्याबद्दलच्या तळमळींतून राष्ट्रवादी काव्य जन्माला आलें असलें तरी वैणिकप्रधान व भावनानिष्ठ असा मराठी काव्याचा स्थायीभाव असल्यानें तें स्थूलमानानें स्थिर राहणें शक्य नव्हतें. या मराठी काव्याच्या क्षीण काल-खंडांतच चिंतनप्रधान नवकाव्याचा उदय झाला.

समाजाचा आमूलाग्र बदल ह्याच अधिष्ठानावर नवकाव्याची निर्मिति झाली आहे. आधुनिक जीवनांवर होत असलेल्या आघातांचे परिणाम नवकाव्यांतून स्पष्ट होत आहेत. एका विशिष्ट सामाजिक दृष्टिकोतांतून अत्याधुनिक जीवन चितारलें जात आहे. मानवी विकृत व एकांगी व्यक्तित्वाच्या साऱ्या छटांचें चित्रण त्यांतून होत आहे. सामाजिक परिस्थिति बदलू पाहणारा ज्वलंत आशावाद त्यांतून निर्माण होत आहे. ही निष्ठा त्यांचेजवळ असल्यानें ते आपली अनुभूति पार्थिव–स्वरूपांत ( Concrete ) प्रकट करीत आहेत. " अनुभूतीस तिच्या संपूर्ण पार्थिव (Concrete) स्वरूपांत व्यक्त करावयाची ही इच्छा काव्याच्या आशयांत संपूर्ण नवेपणा आणील यांत नवल नाहीं त्याचा अपरिहार्य परिणाम या अनुभूतींचें वहन करणाऱ्या प्रतिमा तंत्रावर होणार हें ओघानें आलेंच. प्रतिमांचें अलंकरण मूल्य (Decorative value) गौण ठरून प्रतिमांच्या द्वारें अनुभूतीचीं पीडा तीव्रतम होऊन तिचें स्वरुप स्वतःच्या संपूर्ण पार्थिवतेंत प्रकट व्हावें असा हा प्रतिमासंबंधींचा दृष्टिकोन आहे. या प्रतिमांच्या द्वारें जीवनांतील नानाविध वातावरणाचें, चेतन-अचेतन स्थितींचें जागरण, रसिकांच्या मनांत करून त्यांना त्या अनुभूतींच्या समग्र स्वरूपाचें आकलन व्हावें " असा प्रा. मुक्तिबोधांचा नवकाव्यापाठीमागचा हेतु आहे. प्रतिमांची सुसंगत निवड होण्यावर नवकाव्याचें वैशिष्ट्य अवलंबून राहील. आज सर्रास प्रतीक रूपानें प्रतिमा वापरण्यांत येत आहेत. प्रतिमा आशयाशीं एकनिष्ठ होतील अशाच असणें आवश्यक आहे.

प्रतिमा ( Image ) हा नवकाव्याचा एक विशेष महत्त्वाचा घटक आहे. नवकाव्यांतील अनुभूतीची अभिव्यक्ति किंवा संवाहन प्रतिमेच्या द्वारा होत असते. त्या दृष्टीनें प्रतिमा हा आजच्या नवकाव्याचा व्यवच्छेदक अविभाज्य भाग आहे. अभिव्यक्तीचें एक माध्यम म्हणून अनुभूतिवाद प्रतिमांचा उपयोग करीत आहे.

नवकाव्यांत आज प्रतिमांना दिलेलें महत्त्व मान्य असलें तरी त्यांच्या बंधनांचाहि विचार होणें आवश्यक आहे. प्रतिमांची अवास्तव रेलचेल हेंहि एक दुर्बोधतेचें प्रमुख कारण आहे. एखादी कलाकृति ही सर्वस्वीं प्रतिमांची असली तरी आकार घेणाऱ्या प्रतिमेच्या अभिव्यक्तीला अंतर्गत मर्यादा किंवा बंधन असणें आवश्यक आहे. कलाकृतींत सुसंगतेचें बंधन ज्यावेळी आपण

मान्य करतो त्याचवेळीं अंतर्गत अभिव्यक्तीचा तोल सांभाळण्यासाठीं प्रतिमांना बंधन किंवा मर्यादा कां नको ?

नवकवींजें प्रतिमाचित्रण सर्वसामान्य रसिकाला आकलन होत नाहीं याला कारण दुर्बोधता हेंच आहे. नवकवींची कल्पनाचित्रें व बोधचिन्हें अनाकलनीय झालीं आहेत. प्रा. वा. ल. कुलकर्णी यांच्या 'केवळ विशिष्ट प्रकृतीच्याच वाचकांसाठीं नवकाव्याचें आवाहन आहे' या विधानाऐवजीं 'केवळ विशिष्ट प्रकृतीच्याच टीकाकारांसाठीं नवकाव्याचें आवाहन आहे' हें विधान अधिक समर्पक होऊं शकेल. A mode of apprehension म्हणून नवकाव्यांत प्रतिमांचा उपयोग होत असल्यानें अपरिहार्यपणें अधिकाधिक दुर्बोधता निर्माण होत आहे. या दृष्टीनें असाहि एक प्रवाह वाहत आहे कीं, प्रतिमा या उपमेय म्हणून व्यक्त न करतां उत्प्रेक्षा म्हणून व्यक्त केल्यास नवकाव्यांतील दुर्बोधता कमी होईल.

अप्रकट मनानें वास्तवतेचें आकलन करणें हें नवकवींचें नवें धोरण आहे. पूर्वीचें कवि फक्त जागृत मनानेंच वास्तवतेचें आकलन करीत असत. असें आकलन करून व आपल्या व्यक्तिमत्वाचा ( Poetic personality ) संपूर्ण उपयोग करून नवकविता रचली जात आहे. प्रकट व अप्रकट अशा दोन्ही प्रेरणांचा दुवा कवि-व्यक्तिमत्वानें (Poetic personality) साधला जात आहे.

पुरोगामी वैचारिक बैठकीचें अधिष्ठान नवकाव्यास आहे. अनैसर्गिक मानवी जीवनाच्या नाशाबरोबर मानवतावादी नव्या जगाच्या निर्मितीची घडण नवकाव्य करूं इच्छीत आहे. रूढ परंपरेशीं कांहींशीं विसंगति निर्माण होत असली तरी नवकाव्याचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे. वास्तविक जीवन मूर्त स्वरूपांत करण्याचे काम नवकवि करीत असल्यानें काव्यपरंपरेला अधिकाधिक पुष्ट स्वरूप येत आहे. त्यांत व्यक्तिनिष्ठ व मानवतानिष्ठ अशा दोन अनुभूति प्रत्ययास येत आहेत दोहोंत वैचारिक बैठकीचें वैधर्म्य आहे. आशावादी व निराशामूलक अशा विचारसरणींच्या दोन प्रवृत्ति नवकाव्यांत मूळ धरूं पाहत आहेत. एका प्रवृत्तींत समाजवादी तत्त्वज्ञानांवर व मानवतावादी आशावादावर आधारलेली धारा आहे तर दुसरींत तुच्छतावादी ( Cynic ) असें रूप प्रकट होत आहे. असें असूनहि सामाजिक वास्तवता हा दोहोंचाहि स्थायीभाव आहे. अहंकारी व समाजवादी विद्रोहाची जाणीव

दोन्ही प्रवृत्तींना होत आहे. दोहोंतूनहि सामाजिक वास्तवतेची व्यापक प्रमाणांत दखल घेतली जात आहे.

नवकाव्य वैणिकप्रधाकाव्य नसल्यानें मुक्तछंदाचा सर्रास वापर केला जात आहे. सामाजिक जीवनाचें आकलन करण्यास, त्यांतील अनुभूतीचें अंकन करण्यास मुक्तछंद अधिक उपयोगी आहे. नवकाव्याची विचारसरणी बौद्धिक असल्यानें वीणा-काव्याप्रमाणें भावनांचें आंदोलन प्रकट होऊं शकत नाहीं. नवकाव्यपूर्व कविताप्रमाणें अनुभूतींचें वहन नवकाव्यांतून होत नाही. नवकाव्याप्रमाणें एका विशिष्ट आवश्यक गरजेंतून मुक्तछंदाचा जन्म झाला आहे. मुक्तछंदाशिवाय इतर तत्सदृश छंदांतूनहि नवकाव्याचा प्रसार होत आहे.

नवकाव्य बौद्धिक वैचारिकेंतून जन्माला आलें आहे. त्यांतील जाणीवांप्रमाणें नवछंद आकार घेत आहे. प्रतिमांचा उपयोग सामाजिक वास्तवतेच्या स्वाभाविक प्रकटीकरणांकरितां केला जात आहे, नवकाव्यांत तुच्छतावादी (Cynic) भूमिका आहे. ती सामाजिक विद्रूपता व विकृति यांच्यासंबंधीं असल्यानें त्यांत वैचारिकता आलीच. नवकाव्यांत जाणीवांबरोबर नेणीवांचीहि दखल घेतली जात आहे. प्रतिमांच्या द्वारें नेणीवांतील वास्तवतेच्या छटा सूचितरूपानें चितारल्या जात आहेत. ठोकळ मानानें नवकाव्याची हीं वैशिष्ट्यें मानलीं जावींत.

नवकवि ज्या शोधात होते तें त्यांना सापडले आहे. नवजीवन चितारण्यासाठी आवश्यक असणारीं कल्पनाचित्रें व बोधचिन्हें ( Symbols ) आज त्यांना मिळालीं आहेत. मानवी जीवनाचा सखोल अर्थ सांगण्याचा यशस्वी प्रयत्न नवकाव्यांतून होत आहे. केवळ एकेका क्षणाच्या संवेदना भाषेचा कमी उपयोग करून वाचकांपर्यंत पोहोंचविण्याचें कार्य नवकवींकडून प्रामाणिकपणें होत आहे. आधुनिक कवितेहून नवकाव्य भिन्न आहे. नावीन्यपूर्ण मांडणीनें व अंतरंगानें नवकाव्य उठावदार होत आहे, संवेदनेचें निवेदन त्यांत असल्यानें नवकाव्य अंतराला एकदम स्पर्श करीत आहे. या नवकाव्याच्या उत्क्रांति आलेखांत एका टिंबाच्या स्थानानें जरी मिरवितां आलें तरी मी स्वतःला धन्य समजेन !

फलटण ( उ. सातारा )<br>
'महाराष्ट्रराज्य निर्मिति दिन'<br>
१ मे १९६०

— कृष्णचन्द्र भोईटे

अनुक्रम .. .................. वि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

# अनुक्रम

चैत्रपालवी
अरुंधती मी—
आभाळाला आली पेंग
ऊष्णश्वास
कातरवेळ
मी नच राधा—
प्यास
रात्र
दुलईत चांदण्याच्या
यमुनाकांठीं
जीवन आणि सौंदर्य
संगत
प्रभो
वसुंधरे
प्राची
माळ
हंसू ओघळेल गालावर
चुंबनोत्सुक
तृष्णा
बहाणा
मेंदी
इन्द्रधनु
रतिक्लांत
नजर

किनारा
स्वप्नचित्र
चाळे
कदंब
राधा
विरहिणी
गवाक्षामधून
व्यथा
विराणी
सावज
प्रत्यय कैसा माणुसकीचा
गिरकी
आज माझ्या संसारांत
वंदन
अस्मिता

* * *

## चैत्रपालवी

झरोक्यांतून हिरव्या–
चैत्रपालवीची आस
शेवंतीच्या फुलावर
दरवळे उष्ण श्वास !

तुझ्या डोळ्यांच्या वलयीं
विसावते चंद्रकळा
चार दिवसांत कसा–
मला लाविलास लळा !

उमलत्या जास्वंदीचा
वाऱ्यावरतीं सुगंध
पळसाचा वेल डुले–
कशा मैना झाल्या धुंद !

जास्वंदीच्या वाटेवर
खूण दिसे अधराची
फांदीवरतीं हिरव्या
कुजबूज साळुंकीची !

पाखरांच्या पावलांशीं
रोमांचित येते सांज
केसरी चांदण्यांतील–
कसें विसरावें गूज ?

लोचनांत खिळलेले
घोटाळती दोन क्षण
ओढ्याकाठीं वाटेवर
आठवते हिरवळ !

जुळवी स्वैर बटांना
रेखितों श्यामल तीळ
कुस्करला तुझा गाल-
विसरावा हाच खेळ !

केळीवरच्या दंवांत
अधराचे ओले पंख
अभिलाषेचा घुमतो—
श्वासासह मनीं डंख !

* * *

## अरुंधती मी–

कालिन्दीचा गोविंद तो
ओलाचिंब चांदण्यांत
भिजलेली संध्याराधा
व्याकुळली निःश्वासांत...

—व्याकुळल्या निःश्वासांत
अरुंधती मी जळतें
उन्मन त्या आठवणीं
व्यथा उरीं ठिबकते !...

आज पुनव रात्रीला
थरथर शून्यासाठीं
अनुभूति मौनांतील
महाकाव्य स्फुरे ओठीं !!

* * *

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................... वि: ....................
क्रमांक .................... नों: दि: ....................

# आभाळाला आली पेंग

आभाळाला आली पेंग
धुंद गहिऱ्या श्वासांत
फुटे तृप्तीलाहि पंख—
रानवतीच्या डंखांत !...

केसावरून फिरला
तुझा आसुसला हात
फुलघोषांत वेणीच्या
निथळते लय संथ !...

—झालें उन्हाचें चांदणें
यमुनेच्या ग डोहांत
भिजलेली राधा थिजे—
कामकृष्णाच्या मिठींत !...

* *

## उष्ण श्वास

आठव येतां...इथें नाहींस
अवशेषांचा स्मृति पारवा
दरवळणारा उष्ण श्वास तव
उरांत माझ्या अजुन घुमावा ?

भलतें समजुन मनांत कांहीं
अहंपणानें त्याजिलेंस मज
स्मरणीं माझ्या ओंठ पाकळीं
शपथा साऱ्या....नयनीं हितगुज

थरथरणाऱ्या जळीं पडलेली
बिलगुन बसली ती पडछाया
स्मरतां पण तें....घडलेलें अन्
धुंदवलेली तुझीच काया !

जास्वंदीचीं फुलें माळलींस
लाविलेस अन् कसलें अत्तर
सलला का व्रण ?–गालावरचा,
अशी कशी तूं झालीस अनावर

आंब्याखालीं गार सांवली
कारंजाचें पाणी भंवतीं
थरथरणाऱ्या हिरव्यागार
स्मरतिल साऱ्या तुज गुज गोष्टी !

संवेदना अन् निःश्वसितें ती—
तडफडलेली उरीं भावना
पांखरांपरी विद्ध होउनी
कधीं तरी स्मरशिल वेदना !

पहाट फुलली चांदण्यांत ती
खट्याळ वारा मनिं कुजबुजला
पदर फडफडे मिठींत तेव्हां—
चंद्र रुपेरी गगनीं आला!

गर्भ रेशमी चंद्रकला अन्
आर्त नेत्र तव झाले धुंद
बकुल फुलांचा घमघमला कीं
वाऱ्यावरतीं मातट गंध!

अजुन स्मरते....मिठीच हळवी
शीत चांदणें सदा गारवा....
दरवळणारा उष्ण श्वास तव
उरांत माझ्या अजुन घुमावा?

* * *

## कातरवेळ

पुलकांनीं ओथंबलें
ढगाळलेलें आभाळ
उरीं तीव्र हुरहूर
मन हळवें विव्हळ—

स्मृतींच्या तंद्रींत चाले
पिंपळाची सळसळ
आणि वेणूवनांतील
जातसे विरून शीळ—

चाले आळसावलेल्या
तृप्त धरेचें श्वसन
वेड्या आकाशाला तिचें—
स्निग्ध हवेंच मीलन—

क्षीण उसासे सोडतो
तापलेला नदीघाट
कढते निःशब्दतेनें
हेलावत खिन्न लाट—

उरीं भरतें कांपरें
उदास कातरवेळ
डोळ्यांमधलें गहिरें
थरथरलें काजळ !—

* * *

## मी नच राधा—

गोकुळ नुरलें उदास टिपटिप
कणांकणांतुन उरला दाह
यमुनाकांठीं केवळ दिसतो
गढूळ विटका काळा डोह !...

स्वप्न मनींचें घुमूं लागतां
श्रीकृष्णाचें शैशवभेटे
तरीहि होतें दुःखी मानस
दिसतो रज्जु ...उखळी दिसते!....

सप्तसुरांतुन आम्रतरुतळीं
फुटलीं रन्ध्रें हृदयांमधुनी
परंतु आतां कुजबुज सारी
निर्जिव उरली रिती होडनी !...

कुंजवनांतुन घुमला वारा
राईमधुनी निळसर साज....
अंगांगांतुन उसवि वेदना
सुखद स्मृति पण...विरलें अलगुज!

गोकुळ नुरलें उदास टिपटिप
भान हरपलें, मूर्ति सुंदर
'मी नच राधा गोकुळांतली'
जाणिव करते उरांत कांतर !....

* * *

२]

## प्यास

अबोलीच्या देठांपरी
तुझी गोरी अंगलट
गर्द निळसर साडी
आरस्पानी खुलवट...

शुभ्र चांदण्याचे ओंठ
निळे डोळे मिटलेले
थांग लागेना स्वप्नांचा
मंद वलय लाजलें...

गोड रोमांच उठले
प्यास लागली स्वप्नांची
—मला अतृप्त-अथांग
ओढ हिरव्या मातीची !....

* * *

# रात्र

क्षितिजाच्या भाळावर
निंबोणीच्या झाडामागें
पाहिला मीं एक चन्द्र
धुंद रोहिणीच्या मागें !....

स्निग्ध हळवी नाजुक
शिरशिरली लहर
मंथरल्या भावनांचें
उरीं ठिबके काहूर !....

शीळ वाऱ्याची विरली
संथ निळ्या पाण्यावर
चिंब झाल्या आठवणी
मोहरला गुलमोहर !...

स्मित लाजरें ओसंडे
श्रावणाचें लपलेलें
ओलें हारित चांदणें
पानांमधुनी सांडलें !....

रितेपणानें झुरते
रात्र शिशिरामधली
तिच्या उरींची वेदना
मौनांतुनी आकळली !....

निशिगंधाच्या मिठींत
एक स्वप्न दडलेलें,
निंबोणीच्या झाडामागें
आकाशांत विरघळें !....

* * *

## दुलईंत चांदण्याच्या–

दुलईंत चांदण्याच्या
मोहरते आंबराई
माझें मन शांत करी
चांदण्याची शीतळाई !

मोहरून येतां चांद
निशिगंध सडा घाले
मधुमंद सुगंधानें
शिवार हें दरवळे !

वसुंधरेच्या कुशींत
झोपलें हें रानवन
दिवसाच्या थकव्यानें
सारें विसावें जीवन !

धुंद होतसे काजवा
पानें शांतलीं झाडांचीं
केव्हांपासून चालली
सळसळ पिंपळाची !

पश्चिमेच्या बाजूनेंच
सुटतसे थंड हवा
आणि त्याच धुंदीमध्यें
एक पेंगतो पारवा !....

* * *

## यमुनाकांठीं

वाटचाल ही अगतिक झाली
चंचल राधा उदास वाणी
मौनांमधुनी आली जडता
वाऱ्यावरतीं विरलीं गाणीं ! ....

गिरिशिखरांवर गहिरा रंग
वाट वांकडी पुसट जाहली
नदींत झुरते पंख चिमुकले
गहिंवरली पण पहांट ओली !

डोहांमधली सरली कुजबुज
दंवबिंदूतिल ओघळलें स्मित
अर्धोन्मीलित सुमनांमधुनी
भाव प्रवाही होते निथळत !

धुक्यांत विरली संथपणानें
मौनामधुनी पश्चिमरेषा
धूसर होउन भुरभुरणारी
झांकळलीं अन् उन्मनीं उषा !

मृदुल रेशमी थरथरणारें
इन्द्रधनूचे पराग भिजले
यमुनेमधल्या स्वरलहरींनीं
वाऱ्यावरतीं श्वास सोडले !

शून्य अचेतन छायेमधुनी
कुठें घुमावी मंजुळ मुरली ?
कुंज झाकळे विषण्णतेनें
खिन्न आठवण झाली ओली !

— आंसवांतलें शैशव भेटे
भांबावुन तें दिसतें गोकुळ
नदीप्रवाहीं छाया पडली
वाळूवरतीं रुतले पाऊल !

श्यामल पाणी...श्यामल मूर्त...
लहरीवरतीं....अन् गडबडली
रितेपणानें जडावुनी अन्—
यमुनाकांठीं राधा थिजली !

* * *

# ‘ जीवन आणि सौंदर्य ’

सौंदर्यानें भारावून
जीवन मी विसरलों
........ओथंबल्या संध्येंतील—
काळोख न उमगलो !

वासंतिक चांदरात
हेंच जीवन सुंदर
........तळमळते, कढते—
ग्रीष्मामधली दुपार !

प्रणयोत्सुक जीवनीं
ओंठीं धुंद भावगीतें
........प्रमदेच्या हास्यामध्यें —
दडलेलीं निःश्वसितें !

स्वप्नमय दुनियेंत
गोड भावुक गुंजन
.......‘ दुपार’च्या पोटामध्यें—
आर्त भुकेचें क्रंदन !

स्वप्न-सौंदर्याचा वेध
माझ्या जीवनाचा छंद
........सत्य अथांग उरतां—
वितळली माझी धुंद !

* * *

## संगत

अध्यात्माच्या संगतींत
उभें निष्क्रिय जीवन
बाजारांच्या हिशेबांचें
लेणें लिहावें झिंगुन !........

कसा लावावा त्यांतुन
एक अर्थ सुसंगत
आणि कशी रेखायाची
नक्षी सुंदर टिंबांत !........

शून्यामध्यें शोधायाचें
चित्र विषण्ण पेंगुन
मनोरथांच्या आकृति
विश्व अधिर थिजुन !........

* * *

## प्रभो !—

तूंच प्रभो उधळलीस
गंध-फुलें लहरीवर
अधीर मी वेध घेत
फिरे अनंतांत दूर......

जीव सृष्टि खुललेली
अंकावर विश्वाच्या
रूप तुझें साकळतें
परिसरांत धरित्रीच्या......

नभमंडल लाख तारे
तूंच प्रभो निर्मिलेस
चंद्राचें सांग गूज
उलगडुनी नवविलास......

भावफुलांचें गाणें
फुलते स्वरवीणेवर
इवलेंसें मन माझें
हिंदकळे लाटांवर.......

तूंच प्रभो नवजीवन
शिकविलेंस जगण्याला
विश्वांतील सुंदरता
दाखविशी तूंच मला.......

जोडलेस पंख मला
फिरण्याला दृक्प्रांतीं
नवक्षितिजें धुंडण्याला
तूंच दिली काव्यदृष्टि....

विश्वसख्या !–दरवळतो
मधुर गंध लहरीवर
अधीर मी वेध घेत
फिरे अनंतांत दूर....

* * *

## वसुंधरे !

वसुंधरे जीवनांत
देशी मायेचा ओलावा
युगायुगांनीं चालली
तुझी मानवांची सेवा !

चराचर उजळतें
तुझ्या विशाल दर्शनीं
जीव सृष्टि खुललेली
आज दिसे त्रिभुवनीं !....

रूप मनोहर तुझें
नयनीं मी साठवितों
साकळतां रूप सारें
अतृप्त होऊन जातो !

साऱ्या विश्वांत साठली
आगळीच अनुभूति
नित्य घुमतात तिचे
पडसाद माझ्या ओंठीं !

दुर्बलांच्या मनामध्यें
चैतन्य मी फुलवीन
तुझ्या स्तोत्रांचा कानोसा
अभ्यंतरिं घुमवीन !....

तुझ्या भव्य उन्मेषानें
भारावलें माझें मन
भावुकता ओथंबते
जाणीवेच्या सीमेंतून....

भावफुलें फुलवीत
गीत तुझेंच गाईन
धन्य झालें वसुंधरे
तुझ्या कुशींत जीवन !....

* * *

## प्राची

काळोखाला लपवून
आली प्राची मुरकत
हिरव्या अन् साडीमध्यें
होती अरुणा लाजत !...

प्राजक्तांच्या पावलांनीं
क्षितिजाला रंगविलें
भावप्रतिक्षा करीत
सुमनांना फुलविलें !...

चांदण्याच्या आड जाई
चन्द्र करीत शृंगार
तोंच शुभदा लाजली
सांवरितांना पदर !...

अचानक तोंच कसा
खालीं उतरला शुक्र
केशरी अन् ओटीमध्यें
सौगंधाचा अभिषेक !....

भिजलेलं ओलं अंग
हळूं झटकलं तिनं
तोंच न्हाऊन निघाली !....
धरणी प्रसन्नतेनं !...

अस्फुट सौरभराणी
स्पर्शावांचून फुलली
उंबऱ्यांत क्षितिजाच्या
सूर्यमुखीं व्याकुळली !....

अभिसारिका अरुणा
दंग प्रकाश पूजनीं
तेजाकार जीवनांत
युगेंयुगें सुहासिनी...

* * *

## माळ

पसरे दूरवर
अफाट एकला शून्य माळ
कुणाची न सोबत
केवळ भिरभिरतो
सदैव धुंद वारा !
....तिन्ही सांजेच्या वेळीं
होतें कांतर
जेव्हां माझें मन
जाणवूं लागतें
हळव्या मनाचें, हळवें स्पंदन
सोबत करतो
थरथरणाऱ्या गूढ माळाची !
मरुशांत माळावर
एकच एक
भग्नशून्य राऊळ
करतें व्याकुळ...
उदास माळाचे
उदास डोळे
केवळ भिरभिरतात इथें तिथें—
फुलूं लागतां
श्यामल संध्या
येते चाहुल
खिन्न चांदण्याची
मिस्किल सांवल्या
केविलवाण्या झाल्या
दिसतात बिकट
सावळ्या रंगाची निळसर ढगांची
दिसे न कुठें झांक !

चिंचबनापेक्षां—
आवडला होता मला
अफाट एकला माळ
नव्हतें लागलें झुरणीला
खुरटें गवत....
....अनेकदां फुललें
चांदणें सांज-सकाळ
निळसर गुपीत विणीत मनांतलें
दोन जीव रमले कांहीं काळ....!
आज—
उदास माळ
होऊन उठतो
भीषण वेताळ !

* * *

# हंसूं ओघळेल गालावर

झडून गेली एकच सर !....
झडून गेली लवचिक सर ! !....
निळी शाल
व्यापून आकाशाची
येतां घननिळाची
ओली चाहुल
सुरू जाहलें
सरसर गोड नर्तन !
क्षणांत निघाली न्हाऊन
मधुस्वप्नांकित
वसुंधरा;
नितळ लाजून
मनांत !
झडून गेली एकच सर !....
बसलीं तृणपातीं थबकून
ओल्या मातीचा निरव मृद्गंध
कणांकणांतुन येतां मोहरून
धुंद झाली
भूमि !
झडून गेली एकच सर !....
लवचिक....सरसर
सोडतात
मंद सुवास
शहारलीं–पानें फुलें
निसर्गाच्या उरीं
उचंबळून आला
उल्हास !

झडून गेली एकच सर !....
लपेटून घेतलें
उंच डोंगराला—
धुक्यानें धूसर !—
....केव्हांच संपून गेली सर !
ओल्या पानांना,
चिंब लाजऱ्या
कलिकेला
बिलगून गोंजारतो
स्वैर,
स्वछंद वारा आज आहे संथ;
विसरून अपुला
नित्याचा—
रोजचा, धिंगाणा !
सांगतों कांहींतरी
गोड गुपीत
चिमुकलें,
मिटल्या पाकळ्यांच्या कानांत
हळूच घेऊन चुंबन
जाई पळून
रोमारोमीं—
शहारल्या
गंध-कळ्या !

झडून गेली एकच सर !...
....पूर्वेच्या भाळावर
रंगाचें जाहलें सुरू
नूतन संमेलन
अवचित दिसतो


मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
वि: ..................

क्षितिजावर—
पंचरंगी धनुष्य
उलघडलेला !
...सचैल भिजून
गद्‌गद् हलवितों पानें
वृक्षराजींतुन
ओला चिंब होऊन
पिंपळ !

झडून गेली एकच सर !....
झाली तृप्ति चातकाची
उडून जातो
चंडोल पक्षी
येईल आतां
अंकुर लुसलुशीत
येईल लाजत—
नव्या पानांचा
नवा विलास.
जीवनवेड्या हलधराच्या
मोद पाझरेल डोळ्यांतून—
सार्थकतेचा !— साफल्याचा ! !–

हंसूं ओघळेल गालावर
झडून गेली एकच सर !

* * *

## चुंबनोत्सुक

मनांतल्या चांदण्यांत
निथळलीस न्हाऊन
सुगंधित साऱ्या तृप्ति
आल्या कशा उफाळून ?

कार्तिकांतलें हळवें
उरीं चांदणें शिरलें
थरथरल्या श्वासांचें
वारें तंद्रींत चुकलें !

एक उत्कट चांदणी
लुकलुके पापण्यांत
कुंद ओल्या रेतीवर
जुळलेले दोन हात !

डोळे मिटुनी अलगद
रात्र उसासा सोडते
ओथंबलेली उन्मन
आतुरता पाझरते !

चुंबनोत्सुक ओंठांची
चुकलेली वाट जुळे
तृप्त होऊन आकाश
तोंच क्षितिजाशीं मिळे !

* * *

## तृष्णा

शीळ झिंगते कोंवळी
शहाळ्यांतील लुशींत
आज तडफडणारें
स्वप्न जखमी उरांत !...

आज जाहला परका
अंतर्मुख डोह जागा
हरवते स्वतःलाच
कृष्ण-मुरलीची बाधा !....

गालावरच्या तीळाला
आज स्पर्शतां स्पर्शतां
निळसर डोळ्यांमध्यें
आसुसली भावुकता !....

बटा कुरळ्या केसांच्या
चकवित होत्या मला
स्पर्श तुझा तो उत्सुक
अचानक जाणवला !...

आज कळाली फितुरी
मोहरल्या श्रावणाची
तहानलेल्या जीवांची
तृष्णा ओंठांची—डोळ्यांची !....

* * *

## बहाणा

असा येतो राग तुझा
छळण्याला कांहीं अंत ?
केलेंस तूं छंदी-फंदी
गोऱ्या भुऱ्या हिंदोळ्यांत....

लाजलाल काया गोरी
गाभा गोऱ्या केळीचा ग
एक डोळा पल्लवितां
सले उरीं स्पंदन ग....

उरीं चाले घालमेल
व्यथेला ह्या आहे अर्थ ?
निष्पाप तूं ?....पुरें सोंग
पांघरसी वेड व्यर्थ....

सांगितल्याविना मला...
तुझें गूज कळालें ग
भिरभिरतो का डोळा ?—
पुरे तुझा बहाणा ग....

* * *

# मेंदी

वियोगाची अर्धी रात्र
आज सरता सरेना
स्तब्ध निळ्या आकाशांत
चंद्र झोंपवां झोंपेना....

रात्र फुलतां फुलेना
तुझ्या स्मृतीचें लांछन
श्वासासह शहारते
माझें हिरवें कांकण

अभिलाषेच्या पंखांत
पापण्यांची ओली धुंदी
भाळ चुंबितां चुंबितां
फुलली व्यथेची मेंदी....

* * *

## इन्द्रधनु

इन्द्रधनु झुललेलें
जवानीचें लालबुंद
रन्ध्रारन्ध्रांत उठल्या
झिणझिण्या गोड धुंद !....

राधेच्या डोळ्यावरली
भूल हटेना कृष्णाची
विवस्त्र स्वप्नांत माझ्या—
अभिलाषा आसक्तीची !...

स्वप्न यमुनेच्या तीरीं
तृष्णा सारी हरपते
फुलपांखरू ओंठांचें
मोहरून चकवितें !....

तहानलेल्या श्वासांना
ऊष्ण ओलसर गंध
तुझ्या-माझ्या जाणिवेंत
रहस्य अतृप्त धुंद !....

* * *

## रतिक्लांत !

अभिसारिका ही मुग्धा
ओलीचिंब चांदण्यांत
सोबतीला कुणाची ही
सारखी पाहते वाट !

जवानीची फुले कळी
प्रमत्त अन् सौंदर्यांत
कसली खेळते धुंदी
आज ओल्या पापणींत ?

व्याकुळ पुरन्ध्री ठेवी
वक्षावर दोन्ही हात
मंत्रमुग्ध आज झाली
सुस्त बटा सांवरित !

चंद्र उतरला खालीं
शुक्र भेटतां मध्यांत
झाली बघतां बघतां
स्वप्नप्रिया रतिक्लांत !

* * *

## नजर

दोन डोळ्यांची नजर
आज झाली स्वप्नधीट
ओल्या सुस्त वेदनेची
स्तब्धतेंत उठे लाट....

अनोळखी नजर ही—
आज कशी झाली खुळी
उष्टावते पापणी ही—
निद्राधीन रात्र भोळी !....

...नेत्र स्वप्नाळू थकतां
ओंठ रुते ओंठावर
चांदणीच्या रंगामध्यें
बुडे आधीन नजर !....

* * *

## किनारा

अर्धी रात्र चकविते
स्पर्श तुझा तो उत्सुक
तहानलेल्या स्वप्नाला
येते जाग अचानक !....

अव्यक्तांतील गहिऱ्या
कसें शब्दांना पकडूं ?—
अबोल पापण्यांतील
कसें ईप्सित ओळखूं ?—

मेंदी रंगतां मोहाची
गोऱ्या गोऱ्या अंगावर
सांग उमटले कसे
ओले व्रण ओंठावर !....

सरतां सरेना कशी
वियोगाची संगत गऽ
सांपडतां सांपडेना
मीलनाचा किनारा गऽ....

* * *

## स्वप्नचित्र

आज मौनाच्या वेलीला
कसे उमललें फूल
शब्दाविण आकळले
मुग्ध अधराचे बोल ! ...

गोठला का सारा राग
सारी शेज विस्कटली
चुरगळलेली साडी
मानेवर का ढळली ! ...

हुकलेले निरखित
आळसले आर्तनेत्र
अतृप्तीची उत्कटता
रेंगाळतें स्वप्नचित्र ! ....

* * *

## चाळे

सांज सकाळीं गच्चींत
कुणा वेधतेस सांग
येतां दृष्टिपथांत मी
गाली गुलाबी का रंग ?

ओंठ पाकळ्या लाडानें
काय गुणगुणतात
रसवंतीला बहर—
आला कसा अवचित ! —

सांग कशास सारखी
थबकतेस तूं दारीं ?
आणि तुझ्या चालीमाजीं
सळसळे रीत न्यारी !—

भाळावर निष्कारण
उगा बटा रूळतात
मला पाहतांच कसें
नेत्रशर सूटतात ?

—अवचित दारीं येतां
दूर जाशी का पळुनी ?
हृद्‌भावाचे हे चाळे
कसे उमगावे मनीं ?—

* * *

## कदंब

कदंब तो सृजनशील
ओळखीचा वासंतिक
मधुरवांत मुरलीच्या
राधा मी.... प्रेमोत्सुक !...

नीलकृष्ण...नीलकृष्ण
जपतें मी...स्मरतें मी
थरथरतो विद्ध उर
अगतिक मी...उन्मन मी !...

* * *

# राधा.

घाटावरती गाफील
कसा थबकला कान्हा
गिरकी घेऊनी तेथें
घुटमळती यमुना !—

महिरपलें चांदणें
निळ्या दंवांत भिजलें
पुरंध्रीच्या ओंठापाशीं
कोषांतुन पाझरलें !—

कसा लपविला तिळ
गालावरच्या व्रणांत
किनखाबी निळे डोळे
रसरसलेलें गीत !—

भरजरी चंद्रकळा
कांति केशरी मोहक
सांवरित काळी साडी
चालतांना जातो झोंक !—

विस्तीर्ण यमुनाकांठीं
बावरली प्रियंवदा
मी होतां आज गोविंद
रेखितों चांदणी राधा ! !—

* * *

# विरहिणी

चुकचुके पाल बाई
अवेळीं कां अचानक
सांजवात लावतांना
असा कसा गेला झोंक ?...

कांतरवेळेला माझा—
जीव झाला कां व्याकुळ ?
गोड कन्हैयाचे दिसें
यमुनाकांठीं गोकुळ ?....

श्वास रोधले उरांत
निवळली संध्याकाळ
ओलवले तोंच गाल
थरथरले काजळ !...

...वेड्या होऊन ठाकल्या
धुंद फुंद साऱ्या स्मृति
'इडा पिडा टळो सारी'
विरहिणी म्हणे चित्तीं !...

* * *

# गवाक्षामधून

गवाक्षामधून
पांचवारी सळसळण्यांत
झाली थरथर
गुलाबरंगी ! —
नुकतेंच न्हाऊन
ओल्या केंसाची तेजस्वी बिंदी
चमकली
सोनेरी उन्हांत !
        वाटते
        झुलत्या वाऱ्यापरी
        सन्निध येऊनी
        स्पर्श मधुर—
        गुदगुल्या करीत
        करावी क्रीडा
        ओल्या केंसाशीं !

प्राशिल्याशिवाय
कशी कळावी
थरथरत्या लुसलुसीत
नाजुक कमळाच्या
पाकळ्यापरी
ओंठांतील उन्मत्तता !
        वाटते
        अपार्थिव त्या
        ओंठाशीं भिडावे
        प्राशित
        त्यांतले
        धुंद मधुघट !

गवाक्षामधून
नेत्रकमळें चमकलीं
सुवर्णसंधीला त्या
माझीहि नजर भिडली !—
( बावरलीस कां ? – )
वाटतें
निळया जांभळ्या
वर्तुळांतून
आवर्ताला घालीत आवर
तुझ्या आरस्पानी
ओल्या सुस्त पापण्या
राहावें चुंबित ! ...

पण—
अखेर कळून येतें
स्वप्नमयी तूं —
तुझ्या तेजाची तेजस्वी बिंदी
फक्त—
डोळे मिटून पाहात राहावें !
डोळे मिटून प्राशित राहावें !
डोळे मिटून चुंबित राहावें !

* * *

## व्यथा

अजून स्मरते
वासंतिक त्या सायंकाळीं
वसन ओलसर,
अवखळ काळे
झटकून कुंतल
टिपीत कांहीं—
निघून गेलीस
गूढ टपोऱ्या डोळ्यांमध्यें
ओंठांच्या हास्यालास्यांतच
गांगरलें मन !

अंगावरच्या झुळझुळणाऱ्या
ओल्या वस्त्रांतून
लावण्याचें उघडें—
उधाळित वैभव
सलज्जपणें—
किंचित् स्मित, अस्फुट कुजबूज
करून गेलीस तूं—
मलाच
घायाळ !
नजरेलाहि—
अजून वाटतें....
हाय !
व्यथा उरींची
उसवित जखमा
सदा सारखी
झरत असते !
झरत असते !

* * *

## विराणी

99233

अस्मानाच्या पंखावर
स्वप्नांचीच उधळण
यमुनाकांठची एक—
वेडी बावरे गौळण !

रानतळ्यांत फुललीं
ओल्या सुस्तींत कमळें
चांदण्यामधले सूर
सावलींत साकळले !

शारदांतील नाचती
ओंठीं हास्यांच्या लहरीं
मनःबाधेनें श्यामली
श्रीकृष्ण जपते उरीं !

गुलाबी पाकळींतले
कांहीं मनीं शहारले
लजवंतीच्या लाघवी
निळ्या डोळ्यांत भिजले !

पुनवेच्या चांदण्यांत
प्राजक्तांच्या झावळ्यांत
एक कहाणी विराणी
हनुवटीच्या तिळांत !

* * *

## सावज

डोळे मिटुन घेतले
साक्षी ठेवून क्षितिज
धुंद मदालस डोळे
आज त्यांचा मी सावज...

तृप्त ओंठ अनावर
तूंच केलेस पिऊन
लाविलीस तूंच ओढ
स्वतःलाच हरवुन...

माथ्यावरची चांदणी
शिणलेली खालीं येतां
केलीस तूं रात्र खुळी
धुंद मिठींत रंगतां....

स्वप्न रंगतां रंगतां...
कसा आवरावा तोल
आज केलास तूं उणा
चंद्र चांदण्याचा खेळ

* * *

## प्रत्यय कैसा माणुसकीचा

बौद्ध, अहिंसा, स्वातंत्र्य अन्
विश्वबंधुत्व, —पुरे वल्गना
मानव्याची केली होळी
वृथा कशाला घेतां ताना !

जिथें तिथें ती सत्तास्पर्धा
सत्य, शिवाला जाती विसरुन
अशांतिचा पण—प्रभाव येथें
सत्त्वाचें कधिं व्हावें रक्षण ?

यंत्रयुगाचा इथें चालला
मानवतेशीं निर्दय खेळ
धरतीचीं अन्—मूक आंसवें
स्फुंदत स्फुंदत गळतीं घळघळ !

प्रतारणेच्या ह्या जगतांत
मानव्याचा नित्य उपहास
कृत्रिमतेनें इथें चालला
युगशांतीचा केवळ आक्रोश !

विश्वाच्या भर बाजारांत
महाग होती खुळखुळ नाणीं
पोटाच्या अन् संस्कारास्तव
छातीमधलें आटलें पाणी !

न्यायदेवता इथली असते
निष्ठुरतेनें फाडित ऊर
हतबल झाला इथला मानव
सांडित जागोजागीं नीर !

कसाच आणिक कोणीं करावा
न्याय निवाडा पाप-पुण्याचा
बिलंदर ह्या जगतांत कसा—
प्रत्यय यावा माणुसकीचा ?

आज आमुच्या संसाराला
तडातड ते—तडेंच पडले
शांततेच्या पोटीं येथें
' शीतयुद्धा 'चे गर्भ वाढले !

अणुशक्तीच्या कुरघोडीचें
प्रयोग करती निर्दय दानव
बाजारांतुन संसाराच्या—
आश्चर्यानें बघतो मानव !

* * *

अनुक्रम .............. वि: ..........
क्रमांक ........................ नों: दि: ..........

# गिरकी

आठवणीशीं गिरकी घेऊन
मलाच हंसलें निळें चांदणें
विस्कटुनी अन् पिवळीं स्वप्नें
बर्फ गोठलें तीक्ष्ण दंवानें !....

—स्मरतो आहे ओला गाल
आज असा का...पराभूत मी
तऱ्हाच चुकली कुंतल बंधीं
फिकेंच पातळ....चुकलों का मीं ?

थकलेली तूं मला म्हणालिस—
" रात्र अभावी होईल जागीं ?
सुनेपणानें....एक....एकटे
पहाडांतले कोष्टक त्यागी ? "

—उत्तर जुळलें गणिताचें अन्
आयुष्य सरके नजरेपुढुनी
तेव्हांपासुन आठवेत मज
माझी गिरकी कुणि सन्यासिनि !

* * *

## आज माझ्या संसारांत

आज माझ्या जीवनांत
काटें-कुटें भरलेंत
त्याची नाहीं मला खंत
फुलापरी वाटतात !

नित्य नेहमीं चालतो
ऊन-पावसाचा खेळ
जीवनच फुलविते
प्राजक्ताची प्रभावळ !

मायापांखर प्रेमळ
घालतात माय-तात
वत्सलता ओथंबते
नित्य त्यांच्या सावलींत !

माझ्या सानुल्यांच्या ओंठीं
हास्य शोभे निरागस
आणि त्यांच्या मुखावर
भाव विलसे सालस !

माझ्या प्रियेच्या वदनीं
झरे हास्याचा गोडवा
सुखदुःखाच्या जीवनीं
तिचा सहवास हवा !

इथें भावांचें मोहळ
दिसे स्निग्ध प्रेममय
सांज तेवते सदनीं
मांगल्यता भावमय !

* * *

## वंदन

काळोखाच्या वेदीवरतीं
प्रकाशलेणीं तुम्ही खोदलीं
शतकोटि किरण-प्रभा फांकली
दिव्य प्रभावळ तुम्हीं निर्मिली !

—दीप्तिशलाका स्वातंत्र्याच्या
तुम्हीं दाविल्या काळोखांतुन
छातीवरतीं वज्र झेलुनी
क्षणाक्षणानें दिधलें जीवन !

स्वातंत्र्याचें बांधुन कंकण
स्वातंत्र्यास्तव दिव्य पाहिलें
' स्वराज्य माझा, हक्क जन्मसिध्द '
उद्घोषानें तूंच दिपविले !

ज्योती उज्ज्वल आयुष्यांतिल
कर्तृत्वानें स्फुरतो कणकण
' गीतारहस्या ' मधुनी तुम्हीं—
दिधले मानवतेचें दर्शन !

' निष्काम सदा कर्म करावें
मानव्याची हीच साधना '
उज्ज्वल तुमचा जीवन-मंत्र
अंधारांतील प्रकाश-कणिका !

जिवंत गौरव भारत-भूचा
अपुल्या कर्तृत्वाचा कणकण
जन्मशताब्दी आज आपुली
लवतें मस्तक विनम्र होउन !

* * *



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. ५७ स्थळप
अनुक्रम ...... दि: ...... ......

# अस्मिता

मानव्याचें गात गीत
भीमाकाठीं जमे मेळा
भक्तिभाव पखरण
जनार्दन, चोखामेळा !....

ज्ञानेश्वर, तुकाराम,
जनाबाई ओवीबद्ध
इन्द्रायणी ओली गाथा
माझा नाम्या भक्तिबद्ध !...

माझ्या भक्तीचें निधान
' विठ्ठल विठ्ठल ' नित्य
अभिषेक करितांना
विटेवरीं माझें चित्त !....

माझीं मराठी संस्कृति
माझ्या गर्वाचें प्रतीक
माझ्या हर्षाचे पवाडे
इतिहासाचा उद्रेक !....

भीमा, कृष्णा नि गोदेच्या
' मराठी 'चा मी मराठा
कृष्णेच्या मातीमधुनी
माझी फुलेल अस्मिता ! !....

REFBK-0011233
REFBK-0011233

* * *